# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त
# माजी विद्यार्थिनी गुणगौरव सोहळा व जाणीव जागृती अभियान

वेणूताई चव्हाण कॉलेज, कराडमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त माजी विद्यार्थिनी सन्मान सोहळा व जाणीव जागृती अभियान आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला शनिवार दिनांक 7 मार्च, 2026 रोजी संपन्न झाले. वेणूताई चव्हाण कॉलेज, कराडमधिल अंतर्गत तक्रार समिती व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांचे संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त माजी विद्यार्थिनी सन्मान सोहळा शनिवार दि. 7 मार्च 2026 रोजी संपन्न झाला. प्रमुख वक्ते व पाहुणे म्हणून मा. सौ.अरुणा दिलीपराव चव्हाण, माजी प्राचार्य व सामाजिक कार्यकर्त्या, धनलक्ष्मी उद्योग समूह, कराड या उपस्थित होत्या तर अध्यक्षस्थान मा. ॲड विद्याराणी साळुंखे, माजी नगराध्यक्षा कराड नगरपरिषद कराड यांनी भूषविले.

महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडल्यानंतर विविध क्षेत्रात करिअर करणाऱ्या कर्तुत्वान आणि गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. यामध्ये मधुरा किरपेकर संस्कृत संशोधक व शास्त्रीय गायक कराड, प्रगती देसाई पत्रकार व उद्योजक पुणे, प्रिया गोडसे, समुपदेशक, हार्मोनी समुपदेशन सेंटर, कोल्हापूर, सौ मेघा बढे- पांढरपट्टे आदर्श शिक्षिका, सातारा या विद्यार्थिनींचा ‘आम्ही वेणूताईंच्या लेकी’ असा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सर्व सत्कारमूर्तींनी मनोगत व्यक्त करताना आपल्या कर्तुत्वामध्ये महाविद्यालयाकडून बहुमोल मार्गदर्शन मिळाल्याचे मान्य केले व महाविद्यालयाप्रति आपले ऋण जपण्याचा संकल्प केला. प्रमुख पाहुणे व वक्त्या मा.सौ. अरुणा दिलीपराव चव्हाण यांनी मनोगत व्यक्त करताना भारतीय स्त्रीच्या कर्तुत्वाचा आढावा घेतला, भारतीय स्त्रियांची प्रगती लक्षणीय आहे व सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी उत्तुंग भरारी घेतली आहे. कौटुंबिक व सामाजिक प्रगती ही स्त्रियांच्या यशस्वीतेमध्ये आहे, असे मत व्यक्त केले. अध्यक्ष मा. ॲड. विद्याराणी साळुंखे यांनी महिला दिनाचे औचित्य साधून घेतलेला माजी विद्यार्थिनी सत्कार हा अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे असे प्रतिपादन करून महिला कायदेविषयक माहिती दिली व महिलांनी कायद्यांचा योग्य व समर्पक वापर करावा तसेच महिलांविषयी कायदे महिलांना अधिक सक्षम करण्यासाठी आहेत असे मत व्यक्त केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. जाधव यांनी महिला दिनाचा इतिहास सांगून महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. जिमखाना उपाध्यक्ष प्रा. डॉ. श्रीमती एस. आर. सरोदे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पत्रकारिता क्षेत्रातील करिअरच्या संधीची माहिती प्रगती देसाई यांनी दिली. समुपदेशन क्षेत्रात मोठ्या संधी असल्याचे सांगून त्या क्षेत्रातील करिअर बद्दल प्रिया गोडसे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. श्रीमती एस.पी.पाटील यांनी केले. प्रमुख पाहुणे ओळख डॉ. एन. एस. देसाई यांनी करून दिली तर आभार प्रा. टी.ए. पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन कु. आर्या पवार यांनी केले. कार्यक्रमास IQAC समन्वयक प्रा. डॉ. आर. आर.थोरात, महाविद्यालयातील प्राध्यापक,

**विद्यार्थी, बहुसंख्येने उपस्थित होते.**

पुढारी

संक्षिप्त



सैदापूर : वेणूताई चव्हाण महाविद्यालयात मार्गदर्शन करताना अरुणा चव्हाण, व्यासपीठावर ॲड. विद्याराणी साळुंखे यांच्यासह मान्यवर.

## समाज परिवर्तनात महिलांची भूमिका निर्णायक : अरुणा चव्हाण

**कराड** : भारतीय महिलांनी आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधत समाजात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. कौटुंबिक तसेच सामाजिक विकासात महिलांचे योगदान महत्त्वपूर्ण असून समाजाच्या परिवर्तन प्रक्रियेत त्यांची भूमिका अत्यंत निर्णायक आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या सौ. अरुणा दिलीपराव चव्हाण यांनी केले. वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड येथे अंतर्गत तक्रार समिती व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'आम्ही वेणूताईंच्या लेकी' माजी विद्यार्थिनी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी कराड नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा ॲड. विद्याराणी साळुंखे होत्या. महिलांनी कायद्यांची माहिती घेऊन त्यांचा योग्य वापर करावा, असे आवाहन ॲड. साळुंखे यांनी केले. यावेळी संस्कृत संशोधक व शास्त्रीय गायिका मधुरा किरपेकर, पत्रकार व उद्योजक प्रगती देसाई, समुपदेशक प्रिया गोडसे तसेच आदर्श शिक्षिका मेघा बढे-पांढरपट्टे यांचा 'आम्ही वेणूताईंच्या लेकी' म्हणून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. आर. आर. जाधव, प्रा. डॉ. एस. आर. सरोदे, प्रा. डॉ. आर. आर. थोरात, प्रा. एस. पी. पाटील, डॉ. एन. एस. देसाई, प्रा. टी. ए. पाटील यांसह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन कु. आर्या पवार यांनी केले.

My Satara Edition
Mar 10, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

**प्रमुख पाहुण्यांचे स्वागत....**





**प्रमुख पाहुण्यांचे स्वागत....**



प्रमुख पाहुणे मा. सौ. अरुणा दिलीपराव चव्हाण मार्गदर्शन..



मा. प्राचार्य डॉ. आर. आर. जाधव मार्गदर्शन...



अध्यक्षीय मनोगत मा. . ॲड. विद्याराणी साळुंखे



जिमखाना उपाध्यक्ष प्रा. (डॉ.) एस. आर. सरोदे  मनोगत....



मा.श्रीमती प्रगती देसाई पत्रकार व उद्योजक मार्गदर्शन…



मा. सौ. मेघा बढे-पांढरपट्टे आदर्श शिक्षिका मार्गदर्शन





मा. श्रीमती मधुरा किरपेकर संस्कृत विषय संशोधक मार्गदर्शन



मा. श्रीमती प्रिया गोडसे समुपदेशक  मार्गदर्शन





**स्वागत प्रास्ताविक प्रा. एस. पी. पाटील**



**प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. एन. एस. देसाई**



सूत्रसंचालन प्रा. टी. ए.पाटील

